MHSI020006872022

दाखल तारीख : ०३/११/२०२२
नोंद तारीख : ०३/११/२०२२
निकाल तारीख: ०९/०५/२०२४
कालावधी : वर्षे महिने दिवस
०१ ०६ ०७

**सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), सिंधुदुर्ग, मुक्काम ओरोस यांचे न्यायालयात**

(अमरदीप दा.तिडके यांचे समोर )

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १०/२०२२

**निशाणी क्रमांक .......**

श्री. देवदत्त विद्यानंद देशपांडे }
वय– ४५ वर्षे, धंदा– नोकरी }
रा.फलॅट नं.६०२, बिल्डींग नं.१, }
ऋतू रिव्हर व्हयू क्लासिक, }
आधारवाडी रोड, कल्याण पश्चिम, }
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१ } ...अर्जदार

**विरुध्द**

१. शाखा व्यवस्थापक, }
बँक ऑफ इंडिया, शाखा वेंगुर्ला, }
ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग }

२. शाखा व्यवस्थापक, }
दि सारस्वत को–ऑप. बँक लि., शाखा वेंगुर्ला, }
ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग }

३. शाखा व्यवस्थापक, }
स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा वेंगुर्ला, }
ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग }

४. श्रीमती मधुरा विद्यानंद देशपांडे }
वय– ७२ वर्षे, धंदा– गृहिणी, }

५. श्री. मंदार विद्यानंद देशपांडे }
वय– ४३ वर्षे, धंदा– काही नाही, }
रा.३०२, आकाशदीप सोसायटी, }
धायरी, पुणे ४११ ०४१ }

६. सौ.अनघा चेतन जोग }
पूर्वाश्रमीची कु.अनघा विद्यानंद देशपांडे, }
वय– ३९ वर्षे, धंदा– नोकरी, }
रा.फॅलट नं.८, प्रमोदन सोसायटी, }
चिंचेची तालीम जवळ, शुक्रवार पेठ, }
पुणे ४११ ००२ } ...सामनेवाला

**<u>भारतीय वारसा हक्क अधिनियम, १९२५ चा भाग १० मधील</u>**
**<u>कलम ३७२ अन्वये वारस हक्काचा दाखला मिळणेकरीता अर्ज</u>**

---

| | | |
|---|---|---|
| अर्जदार तर्फे विधिज्ञ | :– | श्री. बी.एन.प्रभू |
| सामनेवाला १ तर्फे विधिज्ञ | :– | एकतर्फा |
| सामनेवाला २ तर्फे विधिज्ञ | :– | श्री.अमोल सामंत–विना म्हणणे |
| सामनेवाला ३ तर्फे विधिज्ञ | :– | एकतर्फा |
| सामनेवाला ४ ते ६ तर्फे विधिज्ञ | :– | श्री.दया प्रकाश निखार्गे |

---

**<u>–:– तों डी न्या य नि र्ण य –:–</u>**

(घोषित दिनांक : ०९/०५/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी भारतीय वारसा हक्क अधिनियम १९२५ चा भाग १० मधील कलम ३७२ अन्वये वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. <u>अर्जातील कथने सारांश रुपाने पुढीलप्रमाणे आहेत,</u>

अर्जदार व सामनेवाला क्र.५ व ६ हे सामनेवाला क्र.४ यांची मुले आहेत. सामनेवाला क्र.४ हिचे पती कै.विदयानंद भालचंद्र देशपांडे यांचे सख्खे बंधु कै. जयवंत भालचंद्र देशपांडे हे दिनांक १८ जानेवारी २०१८ रोजी राजन हॉस्पीटल, कुडाळ, ता.कुडाळ येथे मयत झालेले आहेत. त्यांच्या पत्नी म्हणजेच अर्जदार यांची सख्खी काकी कै.मीरा जयवंत देशपांडे ही दिनांक २३/०६/२०१८ रोजी राजन हॉस्पीटल येथे मयत झाली आहे. कै.जयवंत भालचंद्र देशपांडे व मीरा जयवंत देशपांडे हे मयत दांपत्य असून त्यांना कोणतीही संतती नव्हती व त्यांचे आई वडील ते हयात असतानाच वारलेले आहेत.

**०३.** कै.जयवंत भालचंद्र देशपांडे व कै.मीरा जयवंत देशपांडे यांच्या संयुक्त नावे बँक ऑफ इंडिया शाखा वेंगुर्ला, दि सारस्वत को.ऑपरेटीव्ह बँक शाखा वेंगुर्ला, भारतीय स्टेट बँक, शाखा वेंगुर्ला येथे वेगवेगळया ठेवी रक्कमा गुंतविण्यात आलेल्या आहेत व सदर संपूर्ण ठेवी रक्कमांचे परिपक्वता मुल्य ३६,७०,८५५.९२/– एवढी आहे.

**०४.** कै.जयवंत भालचंद्र देशपांडे व कै.मीरा जयवंत देशपांडे यांच्या मृत्यू पश्चात त्यांनी कै.विद्यानंद भालचंद्र देशपांडे याच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नव्हते. त्यांच्या मृत्यू पश्चात कै.विद्यानंद भालचंद्र देशपांडे हे मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस होते. परंतू विद्यानंद भालचंद्र देशपांडे हे सुध्दा मयत असल्यामुळे अर्जदार व सामनेवाला क्र.४, ५ व ६ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत व अर्जदार व सामनेवाला क्र.४ ते ६ यांना रक्कमेवर प्रत्येकी १/४ कायदेशीर अधिकार आहे. अर्जदार सदर रक्कमेची मागणी करण्याकरीता सामनेवाला क्र.१ ते ३ यांचे कडे गेले असता त्यांनी सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र आणण्यासाठी तोंडी सुचना दिल्या. त्याप्रमाणे प्रस्तुत अर्जदार यांनी अर्ज दाखल करुन वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी विनंती केली आहे.

**०५.** दिनांक ०३/११/२०२२ रोजी माझ्या पूर्वाधिकारी यांनी सामनेवाला क्र.१ ते ६ यांना अर्जाची नोटीस पाठविण्याबाबत आदेश केला. त्याप्रमाणे जाहीर नोटीस देण्याबाबत सुध्दा निर्देशीत करण्यात आले होते. सदरच्या आदेशाप्रमाणे दिनांक २१/०२/२०२३ रोजी सामनेवाला ४ ते ६ यांना प्रस्तुत प्रकरणात हजर होवून लेखी म्हणणे सादर केलेले आहे व अर्जदार यांनी अर्जात केलेली कथने सामनेवाला क्र. ४ ते ६ यांनी मान्य केलेली आहेत. सामनेवाला क्र.१ ते ३ यांना नोटीस लागूनही त्यांनी प्रस्तुत प्रकरणास हरकत नोंदविली नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश व सामनेवाला क्र.२ यास प्रस्तुत प्रकरणात हजर होवूनही म्हणणे दाखल केलेले नसल्यामुळे त्याच्या विरुध्द लेखी म्हणणे नाही असा आदेश माझ्या पूर्वाधिकारी यांनी दिनांक ०७/०८/२०२३ रोजी पारीत केलेला आहे. त्याचप्रमाणे जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर विहीत कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रस्तुत अर्जास कोणीही न्यायालयात समक्ष येवून हरकत घेतलेली नाही.

**०६.** प्रस्तुत अर्जाच्या पृष्ठयर्थ अर्जदार यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र सादर केलेले आहे व विविध बँकेच्या ठेव प्रमाणपत्र नि.३४ ते ३९ वर सादर केलेले आहेत. त्याचप्रमाणे कै.जयवंत भालचंद्र देशपांडे, कै.मीरा जयवंत देशपांडे व कै. विद्यानंद भालचंद्र देशपांडे यांचे मृत्यू प्रमाणपत्र नि.४२ ते ४४ वर सादर केलेले आहे.

**०७.** अर्जदार यांचे विधिज्ञ तसेच अर्जातील कथन विचारात घेता प्रस्तुत अर्जाचे निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी खालीलप्रमाणे मुददे उपस्थीत होतात व सदर मुददयांना पुढील प्रमाणे नमूद कारणांसह निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे त्यांच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास हक्कदार आहेत काय ? | होकारार्थी |
| २. | अंतिम आदेश व हुकूमनामा काय ? | अतिम आदेशाप्रमाणे. |

## : का र ण मि मां सा :

**मुददा क्र.१ करीता :–**

०८.      अर्जदार व सामनेवाला क्र. ४ ते ६ हे मयत विद्यानंद भालचंद्र देशपांडे यांचे प्रत्यक्ष वारस असल्याचे दिसते. मयत विद्यानंद भालचंद्र देशपांडे हा अर्जदार व सामनेवाला क्र.५ व ६ यांचे जन्मदाता वडील असून सामनेवाला क्र.४ हिचे पती असल्याचे कथन अर्जदार यांनी केलेले आहे. कै. विद्यानंद भालचंद्र देशपांडे हे मयत जयवंत भालचंद्र देशपांडे व कै. मीरा भालचंद्र देशपांडे यांचे एकमेव वारस असल्याबाबत कथन केलेले आहे. त्याप्रमाणे ठेव रकमा संबंधी अर्जदारांना वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दिला असून मयत जयवंत भालचंद्र देशपांडे यांचे नावाने स्वतंत्रपणे तसेच कै. मीरा जयवंत देशपांडे व कै. जयवंत भालचंद्र देशपांडे यांचे नावाने संयुक्तीक वेगवेगळया बँकेमध्ये ठेवी ठेवण्यात आले असल्याचे कथन करण्यात आलेले आहे. कै. जयवंत देशपांडे व कै. मीरा देशपांडे हे पती पत्नी असून त्यांना कोणीही मुल–बाळ नव्हते व अर्जदाराचे मयत वडीला व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नव्हते असे कथन अर्जदाराने केलेले आहे. त्याचप्रमाणे अर्जदाराचे वडील विद्यानंद देशपांडे यांचे मृत्यू नंतर सदर ठेवीच्या रक्कमेवर अर्जदार व सामनेवाला क्र.४ ते ६ यांचा कायदेशीरपणे हक्क असल्याचे कथन अर्जदारांनी केलेले आहे.

०९.      अर्जदाराने त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये अर्जाला पुरक असे कथन केलेले आहे. अर्जदाराच्या पुराव्यामध्ये मयत म्हणजे कै. जयवंत देशपांडे व मीरा देशपांडे यांचे नावाने स्वतंत्रपणे व संयुक्तपणे विविध बँकेमध्ये ठेवण्यात आलेल्या ठेव प्रमाणपत्राचे मुल्य अर्जदाराने अभिलेखावर सादर केलेला आहे व सदर ठेवीच्या प्रमाणपत्रास अनुक्रमे नि.३७ ते ४१ देण्यात आलेली आहेत. अर्जदाराने त्यांच्या ताब्यातील ठेव प्रमाणपत्रे सादर केलेली दिसून येते. त्याचप्रमाणे जाहीर नोटीस प्रसिध्द करुनही प्रस्तुत अर्जास कोणाही मार्फत आक्षेप नोंदविण्यात आलेले नाही. या व्यतिरिक्त अर्जदाराचे वडीलांचे मृत्यू प्रमाणपत्र तसेच कै. जयवंत देशपांडे आणि त्यांची पत्नी कै.मीरा देशपांडे यांचे मृत्यूप्रमाणपत्र पुरावा नि.४२ ते ४४ वर सादर

करण्यात आलेला आहे. सर्वसाधारणपणे मयत जयवंत देशपांडे व मीरा देशपांडे यांचे मृत्यूनंतर त्यांना मुल–बाळ असते तर त्यांचे वारस अभिलेखावर सादर केले गेले असते. परंतू सदर दाम्पत्य हे मुल–बाळाविना मयत झालेले असल्याचे कथन अर्जदाराने केलेले आहे. अर्जदाराने अर्जात केलेले कथन व न्यायालयासमक्ष सादर केलेला पुरावा विचारात घेता अर्जदार हे त्यांचे म्हणण्या प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी हक्कदार असल्याचे दिसून येते, त्यामुळे मी मुददा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुददा क्र.२ करीता :–**

**१०.** अर्जदार अभिलेखावर सादर केलेला पुरावा विचारात घेता कै. जयवंत देशपांडे व मीरा देशपांडे यांचे मृत्यूनंतर अर्जदार त्यांची आई साक्षीदार क्र.४ तसेच भावंडे साक्षीदार क्र.५ व ६ हे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार व सामनेवाला क्र. ५ व ६ यांचे हिंदू वारसा कायदयाप्रमाणे प्रत्येकी १/४ हिस्सा असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार व सामनेवाला क्र. ४ ते ६ हे कै.जयवंत भालचंद्र देशपांडे मीरा जयवंत देशपांडे यांचे नावे त्यांना सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी वर नमूद बँकेमध्ये ठेवलेल्या ठेव रक्कमेचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास हक्कदार असल्याचे दिसून येते. सबब मी पुढील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**–:– आ दे श –:–**

०१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. अर्जदार तसेच सामनेवाला क्र.४ ते ६ यांचे नावे त्यांचे ठेव रक्कमेमध्ये प्रत्येकी १/४ हिस्सा असल्याबाबत वारस प्रमाणपत्र भारतीय वारसा अधिनियम कलम ३७८ अन्वये देण्यात यावे.

०३. अर्जदार व सामनेवाला क्र.४ ते ६ यांनी समप्रमाणात वारस प्रमाणपत्राची मागणी रक्कम रुपये ३६,७०,८५५.९२ या रक्कमेवर नियमाप्रमाणे न्यायालयीन शुल्क अदा करावे व सदर शुल्क अदा केल्यानंतर नियमाप्रमाणे वारस प्रमाणपत्र अर्जदार व सामनेवाला क्र. ४ ते ६ यांचे नावे देण्यात यावे.

०४. खर्चाबाबत आदेश नाही.

(सदरचे निकालपत्र खुल्या न्यायालयात तोंडी सांगून, वाचून दाखवून घोषीत करण्यात आले.)

TIDKE AMARDEEP DADARAO
Digitally signed by TIDKE AMARDEEP DADARAO
Date: 2024.05.09 19:41:58 +0530

दिनांक – ०९/०५/२०२४
सिंधुदुर्ग–ओरोस

**( अमरदीप दा. तिडके )**
सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर),
सिंधुदुर्ग–ओरोस.